


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार २ डिसेंबर २०२४ | अंक ३५८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

# मनोज जरांगे पाटलांचा आता नवा डाव, तुळजापुरातून मोठी घोषणा

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळून देण्यासाठी मोठा लढा उभारला. त्यांच्या आंदोलनानंतर सरकारनं मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाला मंजुरी दिली. मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे या मागणीवर अजूनही मनोज जरांगे पाटील ठाम आहेत. त्यांनी आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी देखील केली होती. मात्र ऐनवेळी माघार घेतली. त्यानंतर आता मनोज जरागे पाटील हे आज धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. मनोज जरांगे यांनी तुळजापूरला जाऊन



तुळजाभवानीचं दर्शन घेतलं. त्यानंतर तुळजाभवानीच्या मंदिरातूनच जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे.

## नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?

तुळजाभवानीच्या मंदिरातूनच मनोज जरांगे पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. या पुढचं आंदोलन हे मुंबई येथील आझाद मैदानावर होऊ शकतं, असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. सरकार कुणाचंही असलं तरीही मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेणार. विधानसभा निवडणूक लढविण्याचा फॉर्म्युला जुळला नाही, नाहीतर सुफडा साफ केला असता, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, महाराष्ट्रमध्ये मराठ्यांशिवाय सत्ता स्थापन होऊ शकत नाही, यावेळी मराठा समाजाने ओबीसी आमदार सुद्धा निवडून आणले आहेत. विधानसभा निवडणूक लढविण्याचा फॉर्म्युला जुळला नाही, नाहीतर सुफडा साफ केला असता. यापुढे आरक्षणासाठी आझाद मैदानावर सामूहिक उपोषण होऊ शकतं. आरक्षणाची चळवळ थांबवणार नाही, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील उपोषण सुरू करण्याची शक्यात आहे.आता ५ डिसेंबर रोजी मुंबईच्या आझाद मैदानावर नव्या सरकारचा शपथविधी सोहळा होणार असल्याचं भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांनी ट्विट करत जाहीर केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत अशीही माहिती देण्यात आली आहे. पण यामध्ये मुख्यमंत्री कोण होणार याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. देवेंद्र फडणवीस यांचं नाव अजून कुठेही जाहीर करण्यात आलेलं नाही.




आमचे स्वयंकापघर, आमची जबाबदारी या शिबीर अंतर्गत बीड जिल्हा OMC LPG Distributors मार्फत मेगा सेफ्टी आवरनेस कॅम्प व कूकिंग कॉम्पिटिशन राबवण्यात आले , या दरम्यान HPCL Company चे अहाशवपरसरी SALES AREA Mo sales OFFICER श्री. गणेश करवार साहेब उपस्थित होते, त्याचबरोबर अविनाशजी नाईकवाडे, गुरुकृपा एचपी गॅस एजन्सी चे संग्राम तिवारी साहेब , सुरज एचपी गॅस एजन्सी चे प्रसन्न काळे साहेब प्रदीप गॅस एजन्सी कडून मुळेजी व सहभाग घेतलेल्या सर्व महिलावर्ग.

## सादोळा येथील अवैध वाळू उपसा बंद करा, वाळू उपसा कराल तर गाठ माझ्याशी - प्रदीप सिरसट

**माजलगाव/प्रतिनिधी**

तालुक्यातील सादोळा परिसरातून गोदावरी गंगे पात्रात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत आहे. या गोदावरी पात्रातून रात्रीच्या वेळी रोज हजारो ब्रास बेकायदेशीर वाळू उपसा वाळू माफिया द्वारे केला जात आहे. महसूल विभाग व स्थानिक प्रशासनाकडून या वाळू माफियावर कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर संशय निर्माण होत आहे.



गेल्या अनेक वर्षापासून तालुक्यातील सादोळा गंगे पात्रात शासनाकडून कुठलेही टेंडर काढण्यात आलेले नसताना. हजारो ब्रास बेकायदेशीर वाळूची चोरी करून शासनाचे नियम पायदळी तुडवण्याचे काम सर्रासपणे सुरु आहे. यामुळे शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बुडत आहे. याचे गांभीर्य स्थानिक प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना राहिलेले नाही यासंदर्भात सादोळा येथील सामाजिक कार्यकर्ते प्रदीप सिरसट यांनी आमच्या वार्ताहराशी बोलताना सांगितले की, अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर शासन तर कारवाई करीलच परंतु आम्ही मोठे जनांदोलन उभा करून या वाळू माफियांना वेळीच आवर घालणार आहोत. सादोळा येथील अवैध वाळू उपसा बंद करा, नसता गाठ माझ्याशी आहे.

## आ.संदीप क्षीरसागरांचा बीडकरांकडून अभूतपूर्व नागरी सत्कार

### बीडकरांनी मला कधीच एकटे पडू दिले नाही, सगळे बीड माझे कुटुंब- आ.संदीप क्षीरसागर



बीड दि.१ (प्रतिनिधी):– बीडच्या मायबाप जनतेने मला कधीही एकटे पडू दिले नाही. सगळे बीडच माझे कुटुंब आहे. जनसमान्यांच्या आशिर्वादानेच मी दुर्सयांदा आमदार झालो असून त्यांच्यासाठी पूर्णवेळ उपलब्ध असेन असे आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांच्या नागरी सत्कार सोहळ्यात व्यक्त होताना सांगितले. रविवारी (दि.१) रोजी नागरी सत्कार समितीच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांचा, दुर्सयांदा आमदार पदी निवडून आल्याबद्दल सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते.

रविवार (दि.१) रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे नागरी सत्कार समिती, बीड यांच्या आयोजनाने सलग दुर्सयांदा विधानसभा सदस्यपदी निवडून आल्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांचा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी समस्त बीडकरांच्या वतीने आ.क्षीरसागर यांचा अभूतपूर्व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. निवडणुकीत आपल्याकडे शेकडो प्रवेश झाले. परंतु हे प्रवेश कसल्याही अटी आणि शर्ती विना झाले. विरोधकांनी निवडणूक काळात अक्षरशः पैशांचा बाजार मांडला होता. परंतु बीडच्या जनतेने भूमिकेशी तडजोड न करता एकनिष्ठ राहिल्याने माझी साथ दिली. आता मला माझ्या बीडकरांनी निवडून दिले आहे. मी दुर्सयांदा आमदार झालो आहे. परंतु काही लोकांचा प्रश्न आहे, आता आपण सत्तेत नाही मग परत आपल्याला निधी मिळणार नाही! पण आता या गोष्टीची काळजी करायची गरज नाही. मागील तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजपा सरकारने अडवून धरलेल्या आहेत. आता या निवडणुका होणार आहेत. या निवडणुका होऊन प्रशासक राज जेव्हा हटेल तेव्हा लोक निहाय निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना देणे अनिवार्य असते. सत्ताधाऱ्यांचा त्यातील एक रूपयाही कमी करता येत नाही. त्यामुळे आता विकास कामे आणि निधी यांची चिंता करण्याची कसलीही गरज नसल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी सांगितले. यासोबतच मी अगोदरच सांगुन टाकले आहे की, मजरांगे पाटील म्हणतील तसं...फ असे सांगत मराठा आरक्षणाबाबत आपली स्पष्ट आणि उघड भूमिका असल्याचेही आ.क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. त्याबरोबरच पत्नी नेहाताई क्षीरसागर आणि बंधू अर्जून क्षीरसागर यांनीही निवडणूक काळात साथ दिल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास प्रामुख्याने खा.बजरंग सोनवणे, माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.सुनील धांडे, माजी आ.उषाताई दराडे, काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते रविंद्र दळवी, राजेंद्र मस्के, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, उदयसिंह जी देशमुख, जेष्ठ विधीज्ञ अ‍ॅड.बाळासाहेब कोल्हे, जेष्ठ नेते डी.बी.बागल, आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद खमरूल, अखिल मौलाना साहेब, इक्बाल मौलाना साहेब, ऑल इंडिया ओबीसी ऑर्गनायझेशनचे बीड जिल्हाध्यक्ष हाजी शेख जाकेर महेबुब यांच्यासह त्यांच्या संघटनेचे पदाधिकारी, जेष्ठ विधीज्ञ अ‍ॅड विवेकानंद सानप, वैजनाथ नाना तांदळे, खुर्शीद आलम यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, महाविकास आघाडीतील सर्व मित्र पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि बीड शहर, ग्रामीण एकूण मतदारसंघातील सर्व भागातून बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संदीपभैय्यांना व्हिजन नसते तर बीडकरांनी त्यांना दुर्सयांदा निवडून दिले असते का?- खा.बजरंग सोनवणे



संदीपभैय्यांचे विरोधक पत्रकार परिषद घेऊन विचारत आहेत की, संदीपभैय्यांनी त्यांचे व्हीजन काय ते सांगावे. आता हा प्रश्न विचारण्याचा अधिकार केवळ बीडच्या जनतेला आहे. परंतु तरीही मी एक प्रश्न त्या विरोधकांना विचारू इच्छितो, जर संदीपभैय्यांकडे व्हीजन नसते तर बीडकरांनी त्यांना सलग दुस–यांदा निवडून आणुन आमदार केले असते का? असा सवाल खा.बजरंग सोनवणेंनी या कार्यक्रमातून विरोधकांना केला. बीडकरांनी दुर्सयांदा वाघ विधानसभेत पाठवला आहे. हा खासदार बजरंग सोनवणे कायम तुमच्यासोबत त्यामुळे काळजी करण्याची गरज नाही. संदीपभैय्यांच्या रूपाने पवार साहेबांच्या राष्ट्रवादीचा झेंडा बीडमध्ये फडकला आहे. असे खा.बजरंग सोनवणे यांनी या कार्यक्रमात बोलताना म्हटले.

## डॉ. ज्योतीताई मेटे यांना विधान परिषदेवर संधी द्या - अभिजीत पवार

बीड प्रतीनिधी – अण्णासाहेब पाटील यांच्यानंतर मराठा आरक्षणाची चळवळ जिवंत ठेवणारे लोकनेते स्व विनायक मेटे साहेब यांच्या पत्नी डॉ ज्योतीताई मेटे यांनी विधानसभा अपक्ष म्हणून निवडणुक लढवली आहे. उच्चशिक्षित म्हणून ज्योतीताई मेटे यांच्याकडे पाहिले जाते. बीड जिल्ह्यामध्ये विकासाचा व्हिजन घेऊन डॉ. ज्योतीताई मेटे निवडणूकच्या रिंगणामध्ये उतरल्या होत्या. मेटे साहेब यांनी सुरू केलेली व्यसनमुक्ती अभियान ज्योतीताई यांनी पुढे चालू ठेवले आहे. बीड जिल्हा हा व्यसनमुक्त करण्याचा निर्धार ज्योती मेटे यांनी केलेला आहे. बीड जिल्ह्यामध्ये तरुणांच्या हाताला रोजगार मिळावा यासाठी अनेक वेळा साहेबांनी सुद्धा प्रयत्न केलेले आहेत यानंतर ज्योतीताईंनी सुद्धा अनेक वेळा प्रयत्न केलेले आहेत. ज्योतीताई मेटे यांना विधान परिषदेवर घेतल्यावर नक्कीच बीडचा विकास होईल. डॉ. ज्योतीताई मेटे यांना विधान परिषदेवर संधी द्यावी अशी मागणी यावेळी अभिजीत पवार यांनी केलेली आहे. ज्योतीताई मेटे यांना विधान परिषदेवर संधी दिल्यावर बीडचा कायापलट होईल. ज्योतीताई मेटे एक हुशार व्यक्तिमत्व आहेत. मेटे साहेबांनी १०% राजकारण आणि ९०% समाजकारण केलेले आहे डॉक्टर ज्योती मेटे सुद्धा साहेबांसारखेच १०% राजकारण आणि ९० टक्के समाजकारण करतील.





महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक परंपरेनुसार एखाद्या लोकनेत्याच्या निधनानंतर त्यांच्या कुटूंबीयांच्या सोबत खंबीरपणे उभे राहण्याची आपली परंपरा आहे. यामुळे ज्योतीताई यांना विधान परिषदेवर संधी द्यावी अशी मागणी प्रत्येक कार्यकर्त्यांच्या मनातून होताना पाहायला मिळत आहे. मेटे साहेबांनंतर त्यांच्या कुटुंबाच्या पाठीमागे संपूर्ण जनता आहे. परंतु विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांचा पराभव झाला. लोकनेतेच्या पाठीमागे सर्व समाज बांधव ज्योतीताई यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभा आहे. बीडचा विकास फक्त ज्योतीताई मेटेच करू शकतात. विधान परिषदेवर घेतल्यावर ज्योतीताई नक्कीच बीडचा विकास करतील. त्यासाठी ज्योतीताई यांना विधान परिषदेवर संधी द्यावी अशी मागणी अभिजीत पवार यांनी केलेली आहे.

## जर अजितदादांना सोबत घेतलं नसतं तर आमच्याही १०० जागा आल्या असत्या; गुलाबराव पाटील



विधानसभा निवडणूक निकालामध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. २३० जागांवर महायुतीचा विजय झाला. त्यामध्ये भाजपने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या तर शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार ५७ जागांवर विजयी झाले. राष्ट्रवादी अजित पवार गटाला ४१ जागा मिळाल्या. दरम्यान या निकालावर प्रतिक्रिया देताना आता शिवसेना शिंदे गटाचे नेते गुलाबराव पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. त्यावेळी जर अजित पवार यांना सोबत घेतलं नसतं तर शिवसेनेला १२५ जागा मिळाल्या असत्या आणि आमच्याही शंभर जागा निवडून आल्या असत्या असा दावा गुलाबराव पाटील यांनी केलं आहे.*****

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# द किंग इज बॅक...

रात्री नंतर सकाळ होतेच.... अंधारातून मार्ग काढला की प्रकाश दिसतोच मात्र हीच सकाळ आणि प्रकाश पाहण्यासाठी आपल्याकडे हवा तो संयम आणि स्वतःच्या क्षमतेवर असलेला विश्वास. जर स्वतःच्या क्षमतेवर विश्वास असेल आणि कितीही कठीण काळ आला तरी संयम सोडला नाही तर अपयशाची साखळी तोडून माणूस यशाची शिखरे गाठतोच. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भारताचा माजी कर्णधार आणि धडाकेबाज फलंदाज विराट कोहली. गेली दीड वर्ष विराट कोहली हा अपयशाच्या गर्तेत सापडला होता. धावांची रास उभारणारी विराट कोहलीची बाब त्याच्यावर रुसली होती. शतकाचे इमले उभारणाऱ्या विराटला मागील दीड वर्षात कसोटीत एकही शतक झळकावता आले नाही त्यामुळे त्याच्यावर टीका होऊ लागली. काही महाभागांनी तर त्याला संघाच्या बाहेर ठेवण्याची मागणी केली. स्वतःला क्रिकेटचे तज्ज्ञ म्हणवून घेणारे देखील विराटवर टीका करू लागले. मीडियात देखील विराटवर हल्ला होऊ लागला. विराटचा हरवलेला फॉर्म भारतासाठी चिंतेचा विषय ठरला होता. विराट मात्र टिकाकरांकडे दुर्लक्ष करून आपल्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करत होता. टिकाकारांच्या टीकेला उत्तर देण्यात त्याने वेळ घालवला नाही तो नेहमी म्हणत असत की मला फक्त एका मोठ्या खेळीची गरज आहे. ती जर आली की मी पुन्हा फॉर्मात येईल कारण त्याचा स्वतःचा क्षमतेवर विश्वास होता. त्याला हवी असलेली मोठी खेळी ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या पर्थ मधील पहिल्या कसोटीत आली. पर्थ कसोटीतील दुसऱ्या डावात विराटने धडाकेबाज नाबाद शतक झळकावले आणि भारताला जुना विराट सापडला. विराट पुन्हा फॉर्मात आला. द किंग इज बॅक....असाच इशारा त्याने या खेळीने जगाला दिला. टी २० विश्वचषकातही त्याला म्हणावा तसा फॉर्म सापडला नव्हता मात्र दक्षिण आफ्रिके विरुद्ध महत्वाच्या अंतिम सामन्यात त्याने अविश्वसनीय अर्धशतकी खेळी करून भारताला विश्वविजय मिळवून दिला मात्र पुन्हा त्याचा फॉर्म हरपला नुकत्याच झालेल्या बांगलादेश व न्युझीलंड विरुद्धच्या कसोटी सामन्यांच्या मालिकेत त्याला धावा काढता आल्या नाहीत मात्र ऑस्ट्रेलिया विरुद्ध त्याने आपल्या शतकी तडाखेबंद खेळीने भारताला एकहाती विजय मिळवून देताना अनेक विक्रमांना गवसणी घातली. या शतका बरोबरच त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. हे त्याचे कसोटीतील ३० वे शतक आहे. हे त्याचे ऑस्ट्रेलियातील सातवे शतक आहे. ऑस्ट्रेलियात सर्वाधिक कसोटी शतक झळकावणारा भारतीय असा विक्रम आता त्याच्या नावावर जमा झाला आहे. पूर्वी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावे होता त्याने ऑस्ट्रेलियात सहा कसोटी शतके झळकावली आहेत. विराट कोहलीच्या नावावर आता एकूण ८१ शतक आहेत. कसोटीत ३०, एकदिवसीय सामन्यात ५० तसेच टी २० सामन्यात १ असे एकूण ८१ शतके त्याच्या नावावर जमा झाली आहेत. ८० पेक्षा अधिक शतके झळकावण्याचा पराक्रम करणारा सचिन नंतरचा तो दुसराच खेळाडू आहे. सध्या खेळत असणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. सध्याची कामगिरी पाहता तो लवकरच विक्रमविर सचिन तेंडुलकर यांचा १०० शतकांचा विक्रम लवकरच मोडेल यात शंका नाही. मागील दीड वर्षाचे अपयश मागे टाकून तो पुन्हा आपल्या जुन्या अवतारात परतला आहे हे भारतासाठी शुभचिन्ह आहे. विराट पुन्हा फॉर्मात आल्याने या वर्षी तो धावांचा रतीब घालणार यात शंका नाही. यावर्षी भारत अनेक मोठ्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. या मोठ्या स्पर्धेत विराटचा फॉर्म भारताला विजय मिळवून देईन. यावर्षी एकदिवसीय सामन्यांची चॅम्पियन ट्रॉफी तसेच विश्व कसोटी अजिंक्यपद (ांल) देखील आहे. जर विराटचा हा फॉर्म असाच राहिला आणि त्याला संघातील इतर खेळाडूंनी साथ दिली तर यावेळी भारत या दोन्ही महत्वाच्या स्पर्धेत अजिंक्यपद मिळवेल यात शंका नाही. विराट अजूनही तरुण आहे त्याचा फॉर्म परत आला आहे आणि त्याच्या फिटनेसवर तर शंकाच नाही संघातील सर्वाधिक फिट खेळाडू हा विराटच आहे त्यामुळे तो आणखी तीन चार वर्ष सहज खेळू शकतो या दरम्यान तो सचिनचा १०० शतकांचा विक्रम सहज मोडू शकतो. सचिनचा विक्रम जर कोणी मोडू शकेल तर तो फक्त विराटच आहे कारण आज त्याच्या नावे ८१ शतकांची नोंद आहे. सध्या खेळणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. त्यामुळे सचिनचा विराट विक्रम विराट कोहलीच मोडेल यात शंका नाही

# सोशल मीडियाला वेसण!

ङ्गलहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा। ऐरावत रत्न थोर, त्यासी अंकुशाचा मार।। जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण।।फ या अभंगात संत तुकाराम महाराजांनी लहानपणाची थोरवी वर्णिली आहे. अंगात मोठेपण आले की त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. यासाठी कोणतेही दायित्व नसलेले लहानपणच बरे हे त्याकाळी तुकाराम महाराजांनी सांगितले असले तरी वर्तमानात लहानपणच अधिक यातनादायी झाले आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा १४ नोव्हेंबर हा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो. बालकांच्या हक्काचा वर्षातील हा एकमेव दिवस असला तरी आज लहान मुलांची स्थिती पाहिल्यास त्यांचे बालपण कुठेतरी हरवत चालल्याचे दिसून येते. लहान मुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे म्हटले जाते. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या संधी मिळाल्या पाहिजेत असे पंडित नेहरू यांचे मत होते. विज्ञानाने जग प्रगत झाले आहे. मात्र, याच विज्ञानाने लाभलेल्या मोबाईल, इंटरनेट, व्हीडीओ गेम, केबल टीव्ही यासारख्या साधनांनी मुलांच्या प्रगतीला खीळ घातली आहे, त्यांना वेगळ्याच जगात नेले आहे असे म्हणायची वेळ आली आहे. मित्रांसोबत मैदानी खेळ खेळण्याच्या, पालकांशी गप्पा मारून आपले विचार प्रकट करण्याच्या वयात मुले मोबाईलच्या आभासी जगामध्ये रमताना दिसत आहेत. त्यामुळे बालवयातच मुलांना नेत्रविकार, मनोविकार जडू लागले आहेत. देशासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष हे आजच्या मुलांचे आदर्श नसून कार्टून जगतातील खोटी पात्रे मुलांना आपले आदर्श वाटू लागले आहेत. मुलांचे भवितव्य घडवण्याच्या हेतूने नोकरी–व्यवसायासाठी बाहेर पडणारे आई–बाबा मुलांना उमलत्या वयातच वेळ देत नसल्याने मुलांना त्यांच्याविषयी प्रेम आणि आपुलकीच राहिली नाही. पर्यायाने पालकांकडून मुलांना संस्कारच मिळत नाहीत. संस्कारच नसल्याने हल्लीची मुले पालकांना, मोठ्या व्यक्तींना सर्रास उलट उत्तर देताना, उद्धटपणे वागताना थोडासा सुद्धा विचार करत नाहीत. व्हीडीओ गेम्स, रील्स पाहून लहान मुले मनोविकाराने ग्रासली जात आहेत. मोबाईलमुळे जग मुठीत आले आहे हे खरे असले तरी बालवयातच मुलांना अनैतिक गोष्टींचे शिक्षण मिळत आहे. मोबाईलमुळे मुलांना नको त्या गोष्टींचे शिक्षण मिळत आहे. गत काही वर्षांत लहान मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही कमालीची वाढ झाली आहे. या सा–यांचा परिपाक म्हणून बालगुन्हेगारीचा आलेखही दिवसागणिक वाढत चालला आहे. लहान मुले जरा काही मनाविरुद्ध घडले, घरात कोणी बोलले, अपमान केला, परीक्षेत कमी गुण मिळाले की आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेऊ लागले आहेत. आज बालमजूर प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असला तरी कितीतरी किराणा मालाच्या दुकानात, चहाच्या टपरीवर, हॉटेल्समध्ये, छोट्या कारखान्यात लहान मुले काम करताना दिसतात. मोठ्या शहरात तर लहान मुलांकडून भीक मागून घेणे हा व्यवसाय बनला आहे. हे सारे पाहिल्यानंतर मुलांचे हरवत चाललेले बालपण प्रकर्षाने लक्षात येते आणि प्रश्न पडतो की, हरवत चाललेले बालपण त्यांना पुन्हा मिळवून देण्याचे दायित्व नक्की कोणाचे? पालकांचे, समाजाचे की सरकारचे? मुलांच्या हातात मोबाईल द्यायचा की नाही हा आज मोठा गंभीर प्रश्न बनला आहे. हा केवळ भारतापुरता मर्यादित प्रश्न नाही तर तो सा–या जगाला भेडसावतो आहे. त्या अनुषंगाने ऑस्ट्रेलियाने पहिले पाऊल उचलले आहे. ऑस्ट्रेलियात १६ वर्षांखालील मुलांना समाजमाध्यमे वापरण्यावर बंदी घालणारा कायदा गुरुवारी मंजूर करण्यात आला. हा कायदा फेसबुक, इन्स्टाग्रामपासून स्नॅपचॅटसारख्या सर्व समाजमाध्यमांना लागू आहे. हा कायदा मोडणा–या कंपन्यांना ३२ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतक्या दंडाची तरतूद नव्या कायद्यात करण्यात आली आहे. आतापर्यंत अनियंत्रित समाजमाध्यमांमुळे लहान मुलांवर होणा–या दुष्परिणामांची जगभरात केवळ चर्चा होत होती.फ्रान्ससह अमेरिकेतील काही राज्यांमध्ये पालकांच्या परवानगीने समाजमाध्यमात खाती उघडण्याची मुलांना परवानगी आहे. ऑस्ट्रेलियाने गुरुवारी केलेला कायदा हा सर्वांत कडक असून तो अनेक देशांसाठी मार्गदर्शक ठरू शकेल असे मानले जात आहे. ऑस्ट्रेलियाच्या सेनेटमध्ये ङ्गसमाजमाध्यम किमान वयोमर्यादा विधेयकफ ३४ विरुद्ध १९ मतांनी मंजूर करण्यात आले. कनिष्ठ सभागृहात (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह) बुधवारी १०२ विरुद्ध १३ अशा मताधिक्याने या विधेकावर मान्यतेची मोहर उठवण्यात आली होती. नव्या कायद्यानुसार १६ वर्षांखालील मुलांना टिकटॉक, फेसबुक, स्नॅपचॅट, रेडिट, एक्स(ट्विटर) आणि इन्स्टाग्रामच्या समाजमाध्यमांवर खाती उघडण्यास बंदी असेल. याची अंमलबजावणी करण्यासाठी कंपन्यांना एक वर्षाचा कालावधी देण्यात आला असून त्यानंतर मात्र कंपन्यांना मोठ्या रकमेचा दंड भरावा लागेल. नव्या कायद्याबाबत ऑस्ट्रेलियात मतमतांतरे आहेत. बालहक्क संघटनांनी कायद्याला विरोध केला असला तरी पालकांकडून मात्र नव्या कठोर नियमांचे स्वागत केले जात आहे. भारतातही मीडियावर बंदी घालणा–या कायद्याची गरज आहे. समाजमाध्यमांच्या अति वापरामुळे मुलांचे केवळ मानसिक आरोग्यच नाही तर शारीरिक आरोग्यही धोक्यात आले आहे. कोवळ्या वयातच त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होण्याची वेळ आली आहे. अजाणत्या वयात समाजमाध्यमातील चौफेर भडिमारामुळे अनेक अनैतिक गोष्टींचे ज्ञान त्यांना मिळू लागले आहे. त्यामुळे त्यांचे भावविश्वच कोलमडून जात आहे. मुलांचे मानसिक स्वास्थ्य बिघडल्याने त्यांची मैदानी खेळांची आवड कमी होत चालली आहे. आपल्या देशाने विविध तंत्रज्ञानामध्ये साधलेली प्रगती निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यामुळे माणसाचे चंद्रावर जाण्याचे स्वप्न सत्यात उतरू शकेल परंतु काही विघ्नसंतोषी लोक या तंत्रज्ञानाचा गैरवापर करण्याचीही भीती आहे. सोशल मीडियाची स्थितीही तशीच झाली आहे. या माध्यमातून प्रचंड ज्ञान मिळू शकते परंतु त्याच्या गैरवापराचेही धोके आहेत

## दुःखात जगतो आम्हीं

दुःखात जगतो आम्हीं
स्वप्नं सुखाचे पाहून
काढतो दिस ते वनव्याचे
या काळजास जाळून

रोज नवा घाव झेलतो
जगण्या इथं जीवन
सहतो त्या वेदना असंहनीय
मुठीमध्ये आवळून मरणं

गुदमरून येतं काळीज
ओले होते नयन
दुःखात जगतो आम्हीं
स्वप्नं सुखाचे पाहून

व्याकुळतो प्राण हा
क्षण तो पहावया सुखाचा
पचवतो न गिळंनारा
खाऊन घास तो दुःखाचा

दुःखात जगतो आम्हीं
स्वप्नं सुखाचे पाहून
जगतो आयसे जीवन
जीव निघतो त्यात होरपळून

**अंगद दराडे**
**घळाटवाडी , बीड**

# देखावा नको,मन मोठे असले पाहिजे

बबन गुळवे
मु.पो.उमरगा कोर्ट,ता.अहमदपूर
जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.

आजकाल सोशल मीडियावर काही लक्षवेधक व्हिडिओ पाहायला मिळतात. काही व्यक्ती आलिशान कारमधून उतरतात आणि फुटपाथवर खेळणाऱ्या गरीब मुलामुलींना अन्नपदार्थ खायला देतात,आर्थिक मदत करतात,नवे कपडे व बूट देतात. काही श्रीमंत व्यक्ती गरीब मुलांना व मुलींना हॉटेल किंवा रेस्टॉरंट मध्ये नेऊन जेवण खाऊ घालतात. असे व्हिडिओ सोशल मीडियावर जास्त प्रमाणात पाहायला मिळत आहेत. माणुसकीच्या नात्याने बघितले तर हे व्हिडिओ खरोखर सुंदर असतात.परंतु,केवळ देखावा म्हणून किंवा निव्वळ प्रसिद्धीसाठी असे व्हिडिओ बनवले जात असतील तर ती माणुसकी नसून एक प्रकारची क्रुरताच असते! गरिबीत खितपत पडलेल्या कुटुंबाला,फुटपाथवरील गरीबांना, गंभीर आजाराने त्रस्त व्यक्तीला आणि गरीबीमुळे शिक्षण शिकू न शकणाऱ्या हुशार मुलामुलींना श्रीमंतांनी आर्थिक मदत केलीच पाहिजे.गरजवंताला वेळीच पैशाची मदत केली तर माणुसकी ठरते.पण काही लोकांना मदतीचा इव्हेंट करण्याची घाण सवय असते.काही दुष्ट माणसे गरीबांना कधीच आर्थिक मदत करत नाहीत आणि कोणी गरीबांना मदत करत असतील तर त्याला मदत करु देत नाहीत.काही लोक आणि काही नोकरदार माणसे चारचौघांत खूप बढाया मारतात. आई–वडिलांना, बहिण भावाला, इतर नातलगांना आर्थिक मदत केल्याचे मोठ्या आवाजात सांगतात. परंतु, वास्तविकता अशी असते की त्यांनी पत्नीचे ऐकून आईवडिलांना व नातेवाईकांना कधीच आर्थिक मदत केलेली नसते.बहुतांश लोक भिकाऱ्याला पैसे देताना चार लोक आपल्याला पाहत आहेत की नाही ते बघतात. खरे तर एखाद्या व्यक्तीला आर्थिक मदत करताना किंवा समाजकार्याला व धार्मिक कार्याला दान देताना प्रचार व प्रसार करायचा नसतो.उजव्या हाताने दिलेले दान डाव्या हाताला कळू द्यायचे नसते.दान देताना किंवा गरजू लोकांना मदत करताना देखावा करण्याची गरज नसते.मन मोठे करून सढळ हाताने मदत करावी आणि शांत राहावे. नाहीतर प्रसिध्दीसाठी केलेले दान कुचकामी ठरते ते दान सत्पात्री ठरत नाही.महाभारतातील कर्ण दानशूर व्यक्ती म्हणून ओळखला जातो.मरण ओढवणार आहे हे माहीत असूनही त्याने आपली कवचकुंडले श्रीकृष्णाला देऊन टाकली. आपल्या सगळ्या महापुरुषांनी देशासाठी, समाजासाठी आणि जनतेच्या कल्याणासाठी आपले जीवन अर्पण केले. रतनजी टाटा हे सुप्रसिद्ध उद्योगपती होते.ते सुहृदयी होते,दानशूर होते.त्यांनी त्यांच्या संपत्तीचा काही टक्के हिस्सा नेहमी गरीबांना दान दिला होता.म्हणून त्यांच्या दुःखद निधनाची वार्ता ऐकून सारा भारत हळहळला होता. आपण सगळेजण एका दानशूर व्यक्तीला कायमचे पोरके झालो. माझ्या ओळखीचे एक नोकरदार आहेत.ते फार कंजूस आहेत. जेव्हा ते त्यांच्या आईवडिलांना पैसे देतात तेव्हा एका डायरीत त्याची नोंद करून ठेवतात!ही फार विचित्र आणि मनाला खटकणारी गोष्ट आहे.काही स्वार्थी व कंजूस लोक स्वतःच्या नातेवाईकांना पैशाची मदत करत नाहीत ते परक्या गरजवंताला मदत करू शकत नाहीत.या जगात असे ही काही दानशूर पाहिले आहेत जे की जेथे भरपूर प्रसिद्धी मिळते तेथे दान करायला मागेपुढे पाहत नाहीत. मुंबईमधे आणि इतर शहरांमध्ये काही व्यक्ती खूप दानशूर व्यक्ती आहेत. ते दवाखान्यातील रुग्णांना व रुग्णांच्या नातेवाईकांना फळे व अन्न वाटप करतात.गंभीर आजारांच्या रुग्णांच्या उपचारासाठी सढळ हाताने आर्थिक मदत करतात.त्यांचे मन व हृदय फार मोठे असते म्हणून ते दानशूर म्हणून शोभतात.शेवटी एवढेच सांगावे वाटते की मदत केल्याचा व दान दिल्याचा देखावा न करता मन मोठे करून सढळ हाताने मदत व दान करावे. रक्तदान आणि अवयव दान ही काळाची नितांत गरज बनली आहे.ज्यांना पैशाच्या रुपाने मदत करता येत नाही किंवा दान करता येत नाही त्यांनी रक्तदान व अवयव दान जरूर करावे.हे दान आजच्या काळातील सर्वोत्तम दान असणार आह

# मराठवाड्याने दिले महायुतीला बळ

महाराष्ट्रात ज्याप्रमाणे महायुतीने निर्विवाद यश मिळविले. त्याच धर्तीवर मराठवाड्याने देखील महायुतीला चांगलेच बळ दिले. समाजातील प्रत्येक घटकाने महायुतीला साथ देत त्यांनाच स्वीकारले. लोकसभा निवडणुकीच्या काळात जी परिस्थिती होती ती परिस्थिती मराठवाड्यातील मतदारांनी पूर्णपणे पुसून टाकली. मराठवाड्यात लाडकी बहीण ही योजना यशस्वी ठरल्याचे दिसून येत आहे. मतदानाच्या वाढलेल्या टक्क्यात महिलांची मतदानाची टक्केवारी जास्त होती. यामुळे देखील मराठवाड्यातून महायुतीला भरभरून मतदान झाले. मराठवाड्यातून पेटलेल्या मराठा विरुद्ध ओबीसी आंदोलनाची दखलही बेदखल झाल्यात जमा आहे. कारण मनोज जरांगे फॅक्टर या निवडणुकीच्या निमित्ताने पूर्णपणे संपल्यात जमा आहे. मराठवाड्यातील ठळक घडामोडीत बीड जिल्ह्यातील परळी येथून धनंजय मुंडे यांचा झालेला विक्रमी विजय पंकजा मुंडे यांच्या पराभवाचा वचपा काढणारा ठरला. तसेच मराठवाड्यातील पूर्वीचे महायुतीचे पाच मंत्री पुन्हा निवडून आले. नांदेड जिल्ह्यातील भोकरमधून पहिल्यांदाच निवडणूक लढविलेल्या श्रीजया चव्हाण यांचा विजय तसेच लातूर जिल्ह्यातील उदगीर येथून संजय बनसोडे यांचा विजय, लातूर ग्रामीणमधून धीरज देशमुख यांचा पराभव विशेष उल्लेख करण्यासारखा आहे. औरंगाबाद पूर्व येथून एमआयएमचे इम्तियाज जलील यांचा पराभव मराठवाड्यात चर्चेचा विषय ठरत आहे. छत्रपती संभाजीनगरमधून एमआयएमचे दोन्ही उमेदवार पराभूत झाल्याने मराठवाड्याचे तसेच महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या या पक्षाला आता मराठवाड्यातून काढता पाय घ्यावा लागला. मराठवाड्यातील ४६ मतदारसंघात एकूण ८७९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. त्यापैकी महायुतीला तब्बल ४० जागांवर विजय मिळाला. यंदा पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत बीड जिल्ह्यात सहा मतदारसंघांत १३९ उमेदवार, नांदेड जिल्ह्यातील नऊ मतदारसंघांत १६५ उमेदवार, जालना जिल्ह्यात पाच मतदारसंघांत १०९ उमेदवार, परभणी जिल्ह्यातील चार मतदारसंघांत ५८ उमेदवार, धाराशिव जिल्ह्यातील चार मतदारसंघांत ६६ उमेदवार, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नऊ मतदारसंघांत १८३ उमेदवार, हिंगोली जिल्ह्यातील तीन मतदारसंघांत ५३ उमेदवार, तर लातूर जिल्ह्यातील सहा मतदारसंघांत १०६ उमेदवार उभे होते. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात २५ वर्षांनंतर प्रथमच लोकसभा व विधानसभेची निवडणूक एकत्र पार पडली. या ठिकाणी काँग्रेसचे पूर्वीचे खा. वसंतराव चव्हाण यांचे निधन झाल्याने ही जागा रिक्त झाली होती. लोकसभेच्या पोटनिवडणुकीत काँग्रेसचे रवींद्र चव्हाण हे केवळ चौदाशे सत्तावन मतांनी विजयी झाले. मराठवाड्यातील ५ मंत्री व ४४ आमदार यावेळी निवडणुकीला उभे होते. यापैकी महत्त्वाच्या लढतीकडे लक्ष दिले, तर छत्रपती संभाजीनगरमधून भाजपाचे अतुल सावे यांना एमआयएमचे इम्तियाज जलील यांनी आव्हान दिले होते, तसेच बीड जिल्ह्यातील परळी येथील अजित पवार राष्ट्रवादी गटाचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांना शरद पवार राष्ट्रवादी गटाचे राजेसाहेब देशमुख हे चांगली लढत देतील असे मानले जात होते; परंतु महाराष्ट्रात सर्वाधिक मतांनी निवडून येणारे उमेदवार हे धनंजय मुंडेंच ठरले. तसेच जालना जिल्ह्यात घनसांगवी मतदारसंघातून शरद पवार राष्ट्रवादी गटाचे माजी मंत्री राजेश टोपे यांच्याविरुद्ध मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या



शिवसेनेचे हिकमत उडान यांनी निवडणूक लढविली होती. या ठिकाणी माजी मंत्री राजेश टोपे यांना पराभव पत्करावा लागला. तर लातूर जिल्ह्यातील निवडणूक लक्षवेधक ठरली. या ठिकाणी काँग्रेसचे माजी मंत्री अमित देशमुख यांच्याविरुद्ध देशाची माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्नुषा भाजपाच्या अर्चना चाकूरकर यांनी निवडणूक लढविली. अटीतटीच्या झालेल्या या निवडणुकीत काँग्रेसचे अमित देशमुख हे विजयी झाले. विशेष म्हणजे मराठवाड्यात ते एकमेव आमदार ठरले जे काँग्रेसकडून निवडून आले. याबरोबरच नांदेड जिल्ह्यातील भोकर मतदारसंघातून माजी मुख्यमंत्री तथा भाजपाचे खा. अशोक चव्हाण यांची सुकन्या श्रीजया चव्हाण विरुद्ध काँग्रेसचे तिरुपती कोंडेकर यांच्यात लढत झाली. या ठिकाणी श्रीजया चव्हाण यांचा मोठा विजय झाला. धाराशिव जिल्ह्यातील परांडा मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री तानाजी सावंत विरुद्ध शरद पवार राष्ट्रवादी गटाचे राहुल मोरे यांच्यात लढत झाली. या ठिकाणी तानाजी सावंत हे विजयाचे शिलेदार ठरले. तसेच धाराशिव जिल्ह्यातीलच तुळजापूर येथील भाजपाचे राणा जगजीत सिंग यांनी काँग्रेसचे कुलदीप कदम यांच्याविरुद्ध लक्षवेधक लढत दिली. परभणी जिल्ह्यात पाथरी मतदारसंघातून काँग्रेसचे सुरेश वरपूडकर विरुद्ध अपक्ष बाबाजानी दुर्राणी व राजेश विटेकर अशी लढत झाली. मराठवाड्यातील एकूण ४६ मतदारसंघांपैकी छत्रपती संभाजीनगर व नांदेड जिल्ह्यात प्रत्येकी ९ मतदारसंघात ही निवडणूक पार पडली. छत्रपती संभाजीनगरमध्ये औरंगाबाद मध्य, औरंगाबाद पूर्व, औरंगाबाद पश्चिम तसेच सिल्लोड सोयगाव, वैजापूर, गंगापूर, फुलंब्री, कन्नड–सोयगाव, पैठण, गंगापूर, खुलताबाद या नऊ मतदारसंघांत ही निवडणूक पार पडली. तर नांदेड जिल्ह्यातील नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, भोकर, किनवट, हदगाव, लोहा, नायगाव, देगलूर व मुखेड विधानसभा मतदारसंघांत निवडणूक पार पडली. यानंतर बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव, बीड, आष्टी, केज व परळी या सहा मतदारसंघांत ही विधानसभा निवडणूक पार पडली. तसेच लातूर जिल्ह्यातील लातूर ग्रामीण, लातूर शहर, अहमदपूर, उदगीर, निलंगा व औसा या सहा विधानसभा मतदारसंघांत ही निवडणूक पार पडली. जालना जिल्ह्यात पाच मतदारसंघ आहेत. त्यामध्ये जालना, परतुर, घनसांगवी, बदनापूर व भोकरदन या मतदारसंघांचा समावेश आहे, तर परभणी जिल्ह्यात चार. जिंतूर, गंगाखेड, पाथरी व परभणी या मतदारसंघांत निवडणूक पार पडली. धाराशिव जिल्ह्यात उमरगा, तुळजापूर, उस्मानाबाद व परंडा या चार विधानसभा मतदारसंघांत ही निवडणूक झाली. हिंगोली जिल्ह्यात मराठवाड्यातील सर्वात कमी म्हणजे तीन मतदारसंघांत वसमत, कळमनुरी व हिंगोली येथे विधानसभा निवडणूक पार पडली. मराठवाड्यातील या मतदारसंघातून महायुतीला चांगलेच बळ मिळाले. ४६ पैकी ४० जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाल्याने मराठवाडा हा महायुतीचा आहे, हे मतदारांनी सिद्ध करून दाखविले. देशात झालेल्या लोकसभा निवडणुकीत मराठवाड्याने भाजपाला साथ दिली नाही. त्यामुळे भाजपाच्या वतीने मराठवाड्यात यावेळी विशेष लक्ष देण्यात आले. लोकसभेनंतर विधानसभेचा निकाल भाजपच्या दृष्टीने कसा लागतो, याकडेही संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष होते. मराठा आंदोलनाची धग ज्या मराठवाड्यातून सुरू झाली त्या मराठवाड्याचा कौल कसा असेल? यावर अनेकदा मतमंथन झाले; परंतु मराठवाड्यातील मतदारांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाची कसलीही दखल विधानसभा निवडणुकीत घेतली नाही, हे या निमित्ताने अधोरेखित झाले. मराठवाड्यातील विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजित पवार यांच्या सभा पार पडल्या, तर काँग्रेसच्या वतीने राहुल गांधी, अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या सभा पार पडल्या. या सर्व सभांमधून मराठवाड्याने महायुतीच्या नेतृत्वाला स्वीकारले. महायुतीने जाहीरनाम्यात व विविध सभेतून जे आश्वासन दिले ते आश्वासन पार पाडावे व मराठवाड्याच्या प्रश्नांना तत्काळ मार्गी लावावे, अशी अपेक्षा मराठवाडावासीय महायुतीकडून करत आहेत

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# बीड मध्ये मोफत कृत्रिम हात, पाय वाटप होणार

## देशभक्त पद्मश्री डॉ. रत्नाप्पा कुंभार यांच्या पुण्यस्मृती निमित्त कुंभार समाज विकास संस्थेचा उपक्रम



**प्रतिनिधी बीड**

स्वातंत्र्यसैनिक, सहकारी चळवळीतील अग्रणी नेते देशभक्त पद्मश्री डॉ. रत्नाप्पा कुंभार यांच्या पुण्यस्मृती निमित्त कुभार समजा विकास संस्था, बीड व साधु वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अद्यावत टेक्नॉलॉजीद्वारे फायबर पासून निर्मित अत्यंत हलके व मजबूत कृत्रिम हात व पाय पूर्ण पणे मोफत बसवले जाणार आहेत. यासाठी गरजूंच्या हात व पायाचे माप घेण्यासाठी रविवार २२ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ पर्यंत शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा, राष्ट्रवादी भवन समोर बार्शी रोड बीड येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व समाजातील गरजवंतांनी नोंदणी करून आपल्या हात व पायाचे माप द्यावे असे आवाहन रामदास कुंभार, चनबस वायकर यांनी केले आहे.देशभक्त रत्नाप्पा कुंभार यांच्या पुण्यस्मृती दिन २३ डिसेंबर रोजी विविध उपक्रमाने साजरा केला जातो. या निमित्त कुभार समाज विकास संस्था बीड च्या वतीने गोर-गरिबांसाठी बीड मध्ये मोफत कृत्रिम हात, पाय वाटप करणार आहे. २२ डिसेंबर रोजी हात व पायाची मापे घेतली जाणार असून मापे घेतल्यानंतर ३० ते ३५ दिवसांनी म ोफत अवयव वितरण केले जाणार आहे. गरजवंतांना एकही रूपया लागणार नाही. कृत्रिम हात व पाय लावल्यानंतर मनुष्य चालु शकतो, सर्व दैनंदिन कामे

# श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडकसारख्या नाट्य स्पर्धांमुळे सांस्कृतिक चळवळ गतिमान होईल

## डॉ.दीपा क्षीरसागर यांचे प्रतिपादन; राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन

**प्रतिनिधी बीड**

दि.१ : श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडकसारख्या स्पर्धांमुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील नाट्याभिनयाची आवड असणाऱ्या युवक – युवतींसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होईल. त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळेल आणि यातून मराठवाड्याचा सांस्कृतिक विकास होईल. त्यामुळे अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणे हे भूषणावह तर आहेच, तसेच ती त्या-त्या परिसराची गरज देखील आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय म राठी नाट्य परिषद, मुंबईच्या सदस्य तथा अ.भा.म.ना.प. शाखा बीडच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांनी केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा लातूर व दयानंद महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी शाखाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, उपाध्यक्ष निलेश सराफ, अजय गोजमगुंडे, कार्यवाह धनंजय बेंबडे,




कोषाध्यक्ष अमोल नानजकर, सहकार्यवाह उमाकांत हुरदुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलताना त्या म्हणाल्या, साहित्य, नाट्य, संगीत, कला, आदी बाबींवरून प्रदेशाची सांस्कृतिक ओळख निर्माण होत असते. मराठवाड्यामध्ये कलाकारांची खाण आहे असे म्हटले जाते. याच मराठवाड्याने राष्ट्रीय नाट्य विद्यालय नवी दिल्लीचे माजी संचालक तथा सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक वामन केंद्रे, सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, सुधीर निकम, संदीप पाठक, अरविंद जगताप यांच्यासारखे दिग्गज कलाकार महाराष्ट्राला दिले. ते अशाच नाट्य करंडक स्पर्धांमधून पुढे गेलेले होते. त्यामुळे अशा स्पर्धा खूप महत्वपूर्ण ठरतात. कारण प्रत्येकालाच मुंबई किंवा पुणे याठिकाणी जाऊन नाट्याभिनयाचे धडे घेणे शक्य नसते. त्यामुळे अशाप्रकारच्या स्पर्धा आणि उपक्रम अभिनयाची आवड असणाऱ्या कलावंतांसाठी नवी पाउलवाट तयार करण्याचे काम करत असतात. गोजमगुंडे करंडकचे हे जरी पहिले वर्ष असले तरी येणाऱ्या काळात या नाट्य करंडकचा वटवृक्ष होईल असा मला विश्वास वाटतो. ज्या श्रीराम गोजमगुंडे यांच्या नावाने हे करंडक सुरू केले आहे, ते मराठवाड्यातील पहिले चित्रपट कलावंत, दिग्दर्शक आणि निर्माता होते. त्यांनी अनेक नाटकात आणि चित्रपटात भुमिका साकारलेल्या आहेत. या स्पर्धा अल्पावधीतच नावारूपाला येतील आणि आपला लौकिक सबंध महाराष्ट्रात करतील याची मला खात्री आहे, असे त्या म्हणाल्या. या स्पर्धांना महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातून अनेक संघानी सहभाग नोंदविला होता.

# पवनचक्की कंपन्यांना आमदारांचे आर्थिक हितसंबंधातून पाठबळ:डॉ.योगेश क्षीरसागर

**बीड (प्रतिनिधी)**

दि.१ : आमदारांच्या वरदहस्तामुळे पवनचक्की कंपन्यांकडून बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील शेकडो शेतकऱ्यांची पिळवणूक सुरू आहे. आर्थिक हितसंबंधातून पवनचक्की कंपन्यांना आमदारांचे पाठबळ मिळत आहे. परंतु बालाघाटवरील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी पुढे येऊन तक्रारी कराव्यात, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे. दरम्यान, अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



बीड तालुक्यातील बालाघाटावरील १०-१२ गावांच्या परिसरात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू आहे. हे काम करणाऱ्या कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांसोबत अरेरावीची भाषा करतात. कंपन्यांनी शेतीमध्ये टॉवर उभारले असून या टॉवरवरील तारा ओढताना पिकांचे नुकसान झाले. त्याची शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारची भरपाई दिली मिळत नाही. तसेच, टॉवर व विद्युत तारांमुळे बाधित होणाऱ्या शेतीची नुकसान भरपाई कंपनीने निश्चित केलेली नाही. त्यामुळे ही भरपाई देण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित होते. तसेच, कंपनीकडून यापूर्वी शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्यापोटी चेक दिलेले आहेत, त्यापैकी अनेक चेक बाऊन्स झालेले असून ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे. अशी अनेक प्रकरणे असताना कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांना अरेरावीची भाषा करतात आणि आम दार बघ्याची भूमिका घेतात. यावरून कंपन्यांचे आमदारांशी आर्थिक हितसंबंध आहेत, हे स्पष्ट होते. असे असले तरी कोणत्याही शेतकऱ्याची पिळवणूक होत असल्यास माझ्याशी संपर्क करून तक्रारी द्याव्यात. आपण पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्यामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा करू, असेही पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

# उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे महाआरोग्य शिबिर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा व राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन एच एम) अंतर्गत आदिवासी भागातील रुग्णांसाठी उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे भव्य मोफत ऑपरेशन महाआरोग्य शिबीर दिनांक 10 डिसेंबर 2024 रोजी सकाळी 09 ते दुपारी 02 वाजेपर्यंत तपासणी करून निवड झालेल्या रुग्णांची दिनांक 10 ते 13 डिसेंबर या दरम्यान आवश्यक शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

सदरील शिबिरामध्ये तज्ञ स्पेशालिस्ट डॉक्टर फिजिशियन सर्जन स्त्रीरोग तज्ञ दंतचिकित्सक नाक कान घसा नेत्ररोग तज्ञ बालरोग तज्ञ डॉक्टर शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गुरुगोविंद-सिंगजी रुग्णालय नांदेड आरोग्य संस्थेतील सर्व विशेष तज्ञ डॉक्टर्स तपासणीसाठी उपलब्ध राहणार आहेत.

या शिबिरात हायड्रोसिल अंडवृद्धि हर्निया अपेंडिक्स गर्भ पिशवीचा कॅन्सर चे निदान व पुढील उपचार शरीरावरील गाठी च्या शस्त्रक्रिया रुग्णांचे एक्स-रे ईसीजी सोनोग्राफी सिटीस्कॅन व शालेय मुलांच्या नियोजित शस्त्रक्रिया रक्तदाब मधुमेह हृदयविकार तसेच एच एल एल महालॅब्स द्वारे रक्तातील तपासणी या शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांकडून मोफत करण्यात येणार आहेत.

किनवट व परिसरातील गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्ता केंद्रे यांनी केले आहे.

# आ. प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा - पोकळे,बालासाहेब फपाळ





**माजलगाव प्रतिनीधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यम ान आ. प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट रोजगार सोय रोजगार सेलचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय दादा पोकळे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गट ग्रंथालय बीड जिल्हाध्यक्ष बालासाहेब फपाळ पाटील यांनी माननीय अजित दादा पवार यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे तसेच माजलगाव मतदारसंघातील जनतेतून होत असून. नुकतीच माजलगाव विधानसभा निवडणुक झाली असुन म ाजलगाव विधानसभा मतदारसंघातील म तदारांनी आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली आहे. मागील पस्तीस वर्षांमध्ये आम दार प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे मतदारसंघात केली आहेत. तर जलसिंचनाचे अनेक प्रश्न म ार्गी लावल्याने मतदारसंघातील बहुतांशी शेतकरी आज घडीला समृध्द झाल्याचे चित्र पाहायला मिळते. त्याचबरोबर माजलगावसह या ठिकाणी एम.आय.डी.सी.ची स्थापना झाली असून येथे असणा-या उद्योगामुळे याठिकाणी सुशिक्षीत बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांच्या पोटापाण्याचा प्रश्न मिटला आहे. आ. प्रकाश सोळंके यांनी मतदार संघामध्ये अनेक केलेल्या जनहिताच्या व विकास कामाच्या जोरावरच मतदारसंघातील जनतेने आ. सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघात निवडुण देऊन जनतेच्या मनातील विकसनशील आमदार प्रकाश सोळुंके यांना मंत्रिमंडळात समावेश करावा. असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट रोजगार स्वयंरोजगार सेलचे बीड जिल्हाध्यक्ष विजय दादा पोकळे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट ग्रंथालय विभाग बीड जिल्हाध्यक्ष बालासाहेब फपाळ पाटील यांनी एका निवेदनाद्वारे अजित पवार यांच्याकडे मागणी केली आहे..

# महापरिनिर्वाण पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांचा शपथविधी हा आंबेडकरी अनुयायांचा अवमान असेल:- नितीन सोनवणे

५ व ६ डिसेंबर शपथविधीसाठी निवडणे हे समाजकंटकीय कृत्य देशभरातील बहुजन समाज दुःखात असतो याची जाणीव नसणा-या महायुतीचा निषेध. महायुतीचे समाजकंटकीय कृत्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन संपूर्ण बहुजन समाज दीक्षाभूमीकडे ४ डिसेंबर पासूनच निघालेला असतो.



नव्या सरकारचा शपथविधी ५ डिसेंबर आझाद मैदान येथे घेण्याचे जाहीर झाले हे आंबेडकरी अनुयायांना यांना अपेक्षित नव्हते. महायुती ५ डिसेंबरला जल्लोष करू इच्छित आहे. एकीकडे बौद्ध, आंबेडकर, बहुजन समाज दुःखद असतो आणि दुसरीकडे हे जल्लोष करणार? कसल्याही संवेदना नसलेलं चित्र योग्य नाही तात्काळ राज्यपाल यांनी हा शपथविधी रोखला पाहिजे. तीन तारखेच्या आत शपथविधी घेऊन चैत्यभूमीला करोडोच्या संख्येने येणा-या अनुयायांचे नियोजन नव्या सरकारने केले पाहिजे. समाजकंटकीय कृत्य तात्काळ थांबवावे आंबेडकरी समाजाचे मत घेऊन तुम्ही अशा प्रकारे असंवेदनशील पणे वागणार? यामागे कुठेतरी आरएसएस चा हात आहे. ही तारीख जाणीवपूर्वक बाबासाहेबांचा अवमान करण्याच्या हेतूने ठरलेली आहे.तात्काळ भूमिका बदलावी अन्यथा ऑल इंडिया पँथर सेना शांत बसणार नाही.बीड जिल्ह्याच्या वतीने आम्ही असंवेदनशील महायुतीचा जाहीर निषेध करतो..!

# ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲपद्वारे होणार ई-पीक पाहणी

बीड, दिनांक ०१ : रब्बी हंगाम एक डिसेंबर २०२४ पासून राज्यात सुरू होत आहे. शेतकऱ्यांना पीक पाहणी करण्यासाठी आधी ई-पीक पाहणी मोबाईल ॲप उपलब्ध होते. परंतु आता केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे काही तांत्रिक दुरूस्ती करून नवीन रूपात ई-पीक पाहणी **DCS>** मोबाईल ॲप उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. या नंतर १०० टक्के पीक पाहणी सुधारित ई-पीक पाहणी **DCS>** मोबाईल ॲपद्वारे संपूर्ण राज्यात होणार आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी आपली पीक पाहणी ठराविक मुदतीत करून घ्यावी. जेणेकरून कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अडचण येणार नाही, असे जिल्हा प्रशासनाने कळवले आहे.

शेतकरी स्वत: पिकांची नोंद ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे नोंदवायचे व उर्वरीत पीक पाहणी जे शेतकऱ्यांनी नोंदवलेली नाही, ते तलाठी यांच्यामार्फत होत असत. त्यामध्ये दुरूस्ती करून शेतकऱ्यांना हंगामाच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी करण्यासाठी सहायक यांची नेमणूक करण्यात येत आहे. प्रत्येक गावासाठी सहायक उपलब्ध राहणार असून सहायकामार्फत पीक नोंदणी होणार आहे. पीक विमा, पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती, एमएसपी अंतर्गत पिकांची नोंद इत्यादी सुविधांचा लाभ घेण्यासाठी ई-पीक पाहणी **DCS>** मोबाईलॲपमध्ये पिकांची नोंद असणे आवश्यक आहे.

नवीन मोबाईल ॲपमधील आवश्यकता

पीक पाहणीसाठी निवडलेल्या गट क्रमांकापासून ५० मीटरच्या आत फोटो घेणे अनिवार्य आहे.

पिकांचे दोन फोटो घेणे बंधनकारक.

सुधारित ॲपमधील नवीन सुविधा

शेतकऱ्यांच्या पीक पाहणी मदतीसाठी हंगाम सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून पीक पाहणी संबंधित समस्या सोडविण्यासाठी सहायक उपलब्ध असेल, असेही प्रशासनाने कळवले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

सोमवार २ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# निवडणूक संपताच लालपरी चा प्रवास महागणार, एसटीचा इतके भाडेवाढीचा प्रस्ताव

## सत्तेवर येताच जनतेला भाडेवाढीची भेट नवीन सरकार देणार का? हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

**प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणूक संपल्यानंतर जनतेला आता महागाईला सामोरे जाण्याची तयारी करावी लागणार आहे. ङ्गगाव ते एसटीफ हे ब्रीदवाक्य घेऊन काम करणारे राज्य परिवहन महामंडळाने लालपरीच्या भाडेवाढीचा प्रस्ताव तयार केला आहे. मागील तीन वर्षांत भाडेवाढ करण्यात आली नाही, असे कारण सांगत एसटी महामंडळ आर्थिक अडचणीत आहे. त्यामुळे एसटी महामंडळाच्या प्रशासनाकडून १४.३ टक्के भाडेवाढीचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. म्हणजेच शंभर रुपयांच्या तिकिटांमागे १५ रुपये जास्त द्यावे लागणार आहेत. भाडेवाढीसाठी ही कारणे दिली
महामंडळ आर्थिक अडचणीत अडकले आहे.



एसटी प्रशासनाला शासनाने दिलेल्या सवलतीवर पैसे खर्च करावे लागणार आहे. ते पैसे देखील आता एसटी प्रशासनकडे नाही आहेत. त्यामुळे ही भाडेवाढ करणे प्रशासनाला अनिर्वाय आहे. आता भाडेवाढीचा निर्णय घेतल्याशिवाय काही पर्याय नाही. एसटीचे राज्य सरकारम ध्ये विलनीकरण झाले असत तर ही नामुष्की ओढवली नसती, असे कॉंग्रेस एसटी कर्मचारी संघटनेचे नेते श्रीरंग बर्गे यांनी म्हटले. आता लक्ष नवीन सरकारकडे
एसटी महामंडळाने प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठवला आहे. आता म हायुतीचे सरकार तो मान्य करते की फेटळून लावते? याकडे राज्यातील जनतेचे लक्ष लागले आहे. सत्तेवर येताच जनतेला भाडेवाढीची भेट नवीन सरकार देणार का? हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

## इतकी होणार भाडेवाढ

राज्यात विधानसभा निवडणुका झाल्या. महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले.महायुतीने राज्यभरातील महिलांना अर्ध्या भाड्यात प्रवास करण्याची सवलत दिली. निवडणुकीत महाविकास आघाडीने महिलांना मोफत एसटी प्रवास देण्याची घोषणा केली होती. आता नवीन सरकार अस्तित्वात येताच त्यांच्यासमोर एसटीच्या भाडेवाढीचा प्रस्ताव ठेवला जाणार आहे. १४.३ टक्के भाडेवाढीचे समर्थन करणारा प्रस्ताव महामंडळ प्रशासनाने तयार केला आहे. यापूर्वी २७ नोव्हेंबर २०21 रोजी एसटीच्या तिकीट दरात वाढ झाली होती. आता पुन्हा १२.३६ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव केला. त्यावर खलबते झाल्यानंतर १४.३ टक्के भाडेवाढीचा प्रस्ताव तयार केला.

# माजलगावच्या विकासासाठी आ. प्रकाश दादा यांचा मंत्रिमंडळात समावेश करा शहर उपाध्यक्ष अजिंक्य वाघमारे यांची मागणी

माजलगाव प्रतिनिधी
माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांचा माजलगाव तालुक्याचा विकास करण्यासाठी मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी माजलगाव राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे शहर उपाध्यक्ष अजिंक्य वाघमारे यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे.
नुकत्याच विधानसभा निवडणुक झाली असुन माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी आमदार प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली आहे. मागील पस्तीस वर्षांमध्ये आमदार प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे करून मतदारसंघात विकासाची गंगा आणलेली आहे. माजलगाव मध्ये अनेक विकासकामे मार्गी लागली आहे म तदारसंघातील जलसिंचनाचे अनेक प्रश्न मार्गी



लावल्याने मतदारसंघातील बहुतांशी शेतकरी आज समृध्द झाला आहे. त्याचबरोबर म ाजलगावसह अन्य ठिकाणी एमआयडीसीचे का प्रगतीपथावर असुन याठिकाणी सुशिक्षीत बेरोजगार युवकांना रोजगाराची सोय उपलब्ध झाली आहे. या विकासाकामांच्या जोरावरच म तदारसंघातील जनतेने आ.सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघात निवडुण दिले आहे. आ.सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा यांसाठी माजलगाव मतदारसंघातील राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे माजलगाव शहर उपाध्यक्ष अजिंक्य वाघमारे यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे.



## बालकांचे हक्क यावर जनजागृतीपर कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



बीड : बाल हक्क सप्ताहानिमित्त बालकांचे हक्क या विषयावर शहरातील तेलगाव रोड येथील राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयात प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आनंद यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार (ता.२८) जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी. सोनी केले. युनिसेफच्या वतीने सोनिया हंगे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विधीदूत मिथुन जोगदंड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि. बलभीमराव जाहेर पाटील होते. सूत्रसंचालन श्री.तिडके यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती कदम यांनी आभार मानले

# रब्बीसाठी तीन, तर उन्हाळ्यात चार पाणी माजलगाव धरणातून सिचनासाठी सोडणार



## शेतक-यांना दिलासा

**-माजलगाव** दि ३० (बातमीदार) माजलगाव धरण यावर्षी ८० टक्यांच्या पुढे भरलेले आहे. त्यामुळे यावर्षी धरणातून रब्बी हंगामासाठी तीन, तर उन्हाळी हंगाम ासाठी चार असे एकूण सात आवर्तन मिळणार आहेत. त्यामुळे उस उत्पादक शेतक-यांना मात्र दिलासा मि ळाला असून नवीन उस लागवड मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.
तालुक्यातील बहुतांशी शेतकरी हा धरणाच्या पाण्यावर रब्बीचे नियोजन करून गहु, ज्वारी, हरभरा आदी पिकांची लागवड करतो. परंतु, मागील वर्षी धरण भरले नसल्याने शेतीला सिंचनासाठी पाणी मिळाले नाही. परिणामी रब्बी हंगामातील पिके घेण्यासाठी शेतक-यांना पाणी उपलब्ध झाले नसल्याने शेतक-यांचा हिरमोड झाला होता.
तर, उसाची लागवड देखील अल्पच झाली होती. यावर्षी मात्र धरण ८० टक्यांच्या पुढे भरलेले असून धरण प्रशासन व जलसंपदा विभागाच्या वतीने सात पाणी आवर्तनांना मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आता घरणातून रब्बी हंगामासाठी तीन व उन्हाळी हंगामासाठी चार, असे एकूण सात आवर्तने होणार आहेत. त्यामुळे रब्बी व उन्हाळी हंगामातील पिकांना धरणातून पाणी मिळणार असल्याने शेतक-यांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे उसाचे क्षेत्र वाढण्यास मदत होणार आहे.
२९ हजार ६६ क्षेत्र धरणातील पाण्यामुळे रब्बी हंगामात ओलीताखाली येणार
१८ हजार ४९३
हेक्टर क्षेत्र उन्हाळी हंगामात ओलीताखाली येण्यास मदत होणार– ७२ दलघमी पाणी रब्बीसाठी सोडणार
८८.१७ दलघमी पाणी उन्हाळ्यात पाणी सोडले जाणारासल्याची माहिती संमधीत कार्यालया कडून देण्यात आली आहे

# बीड येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राजपत्रित अधिकारी पूर्व परीक्षा शांततेत

**माजलगाव प्रतिनिधी**

.रविवार १ डिसेंबर रोजी उपजिल्हाधिकारी , पोलीस उपअधीक्षक , तहसीलदार इत्यादी पदांसाठी घेतली जाणारी राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा बीड येथे शांततेत पार पडली . बीडचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रप्रमुख तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यासह समन्वय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ओंकार देशमुख , तहसीलदार चंद्रकांत शेळके , अविनाश शिंगटे , नरेंद्र कुलकर्णी , उपकेंद्र प्रमुख , पोलीस कर्मचारी व अधिनस्त कर्मचारी यांनी या कामी मेहनत घेतली . एकूण दहा केंद्रावर ३०४७ उमेदवार होते . त्यापैकी सकाळच्या सत्रात २०१० तर दुपारच्या सत्रात १९९७ उमेदवार हजर होते .



राजपत्रित अधिकारी पूर्व परीक्षा संपूर्ण महाराष्ट्र राज्यात एक डिसेंबर रोजी घेण्यात आली . राजपत्रित अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगणारे अनेक तरुण-तरुणी रात्रंदिवस अभ्यास करून ही परीक्षा देत असतात . अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणा-्या या परीक्षेत बीडला कोठेही अनुचित प्रकार घडला नाही व अत्यंत शांततेत ही परीक्षा पार पडली असे जिल्हा केंद्रप्रमुख तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सांगितले .

विविध केंद्रावर भेटी दिल्या असता विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता दिसून आली . परीक्षा संपल्यानंतर काही खुशीत दिसले तर काहींचे चेहरे पडलेले दिसले . अर्थातच या परीक्षेत बौद्धिक क्षमतेचा कस लागत असतो . बीड येथे चंपावती विद्यालय , चंपावती इंग्रजी शाळा , भगवान विद्यालय , शिवाजी विद्यालय , सौ के एस के महाविद्यालय , संस्कार विद्यालय , गीता कन्या प्रशाला , बलभीम महाविद्यालय , छत्रपती शाहू विद्यालय , चंपावती विद्यालय येथे या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते .

सकाळी दहा ते बारा या पहिल्या सत्रात पहिला पेपर घेतला गेला तर दुपारी तीन ते पाच या कालावधीत दुसरा पेपर घेण्यात आला . बीड जिल्ह्यातून ३०४७ उमेदवारांनी आपला अर्ज दाखल केला होता . सकाळच्या सत्रात २०१० विद्यार्थी हजर होते तर १०३७ गैरहजर होते . दुपारच्या सत्रात १९९७ विद्यार्थी हजर होते तर १०५० गैरहजर होते . विविध केंद्रावर उपकेंद्र प्रमुख म्हणून पॉलिटेक्निक कॉलेजचे अधिव्याख्याता विवेक थिगळे , दत्तात्रय वाघ आनंद जाधव , महेश रायते , दत्तात्रय करवर , सुहास वीर , प्रफुल्ल गावडे , सचिन देशमुख , अन्सारी ए आर , सचिन आगाम यांनी काम पाहिले .

ही परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची परीक्षा असते . म्हणजे दिलेल्या पर्यायातून एका पर्यायाची निवड करायची असते . प्रश्नपुस्तिका उम ेदवारांना सोबत घेऊन जाण्याची मुभा असते .

परीक्षेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी व गैरप्रकारास प्रतिबंध करण्यासाठी पोलीस प्रशासनाची मदत घेण्यात येते . प्रत्येक उमेदवाराची त्यांच्या डोळ्यांचे स्कॅनिंग करून बायोमेट्रिक पद्धतीने तपासणी करण्यात येते . त्यामुळे कोठेही गैरप्रकार होण्याची शक्यता राहत नाही . दिव्यांग उमेदवारांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात येते . उमेदवारांना परीक्षा कक्षात त्यांच्या बॅग्स , स्मार्ट वॉच , डिजिटल वॉच , मायक्रोफोन , ब्लूटूथ इत्यादी दूरसंचार साधने अथवा डायरी , पाऊच , परीगनक ( कॅल्क्युलेटर ) , मोबाईल फोन , पुस्तके इत्यादी घेऊन जाण्याची मुभा नसते . विद्यार्थ्यांची ओळख पटविण्यासाठी ते स्वतःचे आधार कार्ड , निवडणूक आयोगाचे ओळखपत्र , पॅन कार्ड , स्मार्ट कार्ड , ड्रायव्हिंग लायसन्स , पासपोर्ट इत्यादी सोबत ठेवू शकतात .

परीक्षा केंद्रावर एका हॉलमध्ये प्रत्येकी २४ उमेदवारांची बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली असते . त्यांची प्रश्न पुस्तिका ही अ ब क ड अशा संचामध्ये असते , जे की वेगवेगळे असतात . उत्तरपत्रिका वाटप करणे , प्रश्नपुस्तिका वाटप करणे , हजेरीपट भरून घेणे इत्यादी कामे समवेक्षक करून घेत असतात . समवेक्षक हे हजेरीपटावर सही घेताना प्रवेश प्रमाणपत्रावर व हजेरीपटावर असलेले उमेदवाराचे छायाचित्र हे एकच असल्याची खात्री करून घेतात .

बीड जिल्ह्यातुन अनेक अधिकारी यापूर्वी निवड झालेले आहेत . अनेक अधिका-्यांनी बीडचे नाव देशात व राज्यात उंचावलेले आहे . त्याचाच परिणाम म्हणून नवीन पिढीला आपणही अधिकारी व्हावे असे वाटत असते . बीडचे विद्यार्थी पुणे , छत्रपती संभाजीनगर येथे पूर्वपरीक्षेचा , मुख्य परीक्षेचा अभ्यास करतात असे एका परीक्षार्थीने यावेळी सांगितले .

परीक्षा केंद्राच्या प्रमुखास उपकेंद्र प्रमुख असे म्हणतात . साधारणतः तीन ते चार मतदान केंद्रांमागे एक समन्वय अधिकारी म्हणून नेमलेले असतात . बीड येथे जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख , तहसीलदार चंद्रकांत शेळके , तहसीलदार अविनाश शिंगटे यांनी समन्वय अधिकारी म्हणून उत्तमरीत्या कर्तव्य बजावले . सर्व केंद्रावर प्रश्नपुस्तिका व उत्तरपत्रिका पोहोच करणे , केंद्रावर शांतता व सुव्यवस्था असल्याची खात्री करणे इत्यादी कामे समन्वय अधिका-ंची असतात .

एकंदरीतच प्रशासनाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणारी राजपत्रित अधिकारी पूर्व परीक्षा शांततेत पार पडली .

## वृक्ष लागवड करून केले अस्थीचे विसर्जन



परळी । प्रतिनिधी आईचं जगणं अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गेले जिद्दीने संसार पोरांना संस्काराचे धडे दिले भालेराव कुटुंबातील . सदस्यांनी रक्षा विसर्जीत न करता वृक्षारोपण करून आदर्श निर्माण केला आहे. टोकवाडी येथील शकुंतला पांडुरंग भालेराव, यांचे नुकतीच निधन झाले होते . सावडण्याच्या दिवशी अस्थि विसर्जन, प्रचलित पद्धतीप्रमाणे नदीपात्रात करतात परंतु विसर्जन पाण्यात न करता एक झाड लावून त्यामध्ये अस्थि व राख विसर्जन करत, दिवंगत व्यक्तीच्या स्मृती जतन कराव्यात, यासाठी जनजागृती केली आहे. भालेराव कुटुंबातील दिलीप भालेराव मुकिंद बनसोडे मुलगी ज्योती शिंदे रत्नमाला शिंदे मुलगा संतोष भालेराव तसेच परिवारातील सामाजिक जाणिवेतूनसामाजिक जाणिवेतून या उपक्रमाला प्रतिसाद देत लावून अस्थि विसर्जन केल्या. यावेळी डॉ. बाबासाहेब शिंदे.पंडित रोडे भरत रोडे अविनाश शिंदे प्रशांत साळवे.मुंडे परिवारासह परिसरातील नागरिक महिला उपस्थित होत्य

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com